दैनिक
# साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

डारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

ंक : १०५ शुक्रवार २५ ऑक्टोंबर २०१९ मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ - ८) मूल्य : ३ रुपये

# सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांना उलट तपासणीसाठी साक्षीदार बोलविण्यासाठीचा अर्ज दाखल



- सर्वोच्च न्यायालयातर्फे मा. ॲडिशनल सॉलिसिटर जनरल वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांची न्यायमित्र (Amicus Curiae) म्हणुन नियुक्ती
- बॉम्बे बार असोसिएशन (BBA) व बॉम्बे इनकॉर्पोरेटेड लॉ सोसायटीने (BILS) च्या तक्रारीत तथ्य नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल; ॲड. मॅथ्यु नेदूमपारा दोषमुक्त
- उत्तरवादी क्र. २ रशीद खान पठाण यांच्या मुद्यांवर सर्वोच्च न्यायालय देणार ऐतिहासिक निकाल
- सुप्रीम कोर्टचे रजिस्ट्रार रेनू दिवान, आर. नटराजन, आरोपी मिलिंद साठे, ॲड . फली नरिमन, कैवान कल्याणीवाला यांची ही उलट तपासणीसाठी नावे
- आरोपी मिलिंद साठे व त्यांच्या फौजदारी कटात सहभागी कैवान कल्याणीवाला, ॲड. फली नरिमन यांची चौकशी सीबीआयकडे देण्याची मागणी
- खोटी तक्रार करणारे बॉम्बे बार असोसिएशन व बॉम्बे इनकॉर्पोरेटेड लॉ सोसायटीने R. K. Jain (2010) 8 SCC 281 प्रकरणातील कायद्यानुसार १० कोटी रुपये अंतरिम नुकसान भरपाई द्यावी.
- न्या. रोहीटन नरिमन व न्या. विनीत सरण यांच्या बेकायदेशीर आदेशामुळे उत्तरवादींच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यामुळे Ramesh Maharaj (1978) 2 WLR 902 च्या कायद्यानुसार शासनाने १० कोटी रुपये अंतरिम नुकसान भरपाई द्यावी या मुद्द्यांवर सुनावणी.
- बॉम्बे बार असोसिएशन (BBA) व ॲड. असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (AAWI) चे अनेक सदस्य वकिलांनी रशीद खान पठाण यांच्यातर्फे सर्वोच्च न्यायालयात मांडली बाजू
- भ्रष्टाचारी ॲड. मिलिंद साठेचा वरिष्ठ वकिलाचा दर्जा काढून त्याला देशातील सर्व न्यायालयात काम करण्यास बंदी घालून कोर्ट अवमानना अंतर्गत मिलिंद साठे व कैवान कल्याणीवाला यास कठोर शिक्षा करण्याची मागणी.
- जेष्ट समाजसेवक अण्णा हजारेंसह अनेक कार्यकर्ते, इंडियन बार असोसिएशन, सुप्रीम कोर्ट लिटिजन्ट्स असोसिएशन, ऑल इंडिया एस. सी., एस. टी. ॲड. मायनॉरिटी लॉयर्स असोसिएशन , साहसिक लोक जनशक्ती पार्टी, आर पी आय, मानव अधिकार सुरक्षा परिषद आदी विविध संघटनांचे सदस्य पदाधिकारी व कार्यकर्ते हे दि.४ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी हजर राहणार

*प्रतिनिधी/ २४ ऑक्टोबर*

**नवी दिल्ली :** न्या. रोहिंग्टन नरिमन व न्या. विनीत सरण यांनी रेकॉर्डवर नसलेले कागद व पुरावे कुठून आणले याची कोणतीही नोंद आदेशात न करता केलेल्या गैरकायदेशीरपणा संदर्भात त्या दोघांना उलट तपासणीसाठी साक्षीदार म्हणून बोलाविण्याकरिता उत्तरवादी रशीद खान पठाण यांच्या मुद्यावर दि. ४ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठापुढे सुनावणी होणार असून सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात मा. ॲडिशनल सॉलिसिटर जनरल सिद्धार्थ लुथरा यांची न्यायमित्र (Amicus Curiae) म्हणून नियुक्ती केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की , सर्वोच्च न्यायालयात न्या. रोहिंग्टन नरिमन व न्या. विनीत सरण यांच्या खंडपीठापुढे एका वकिलाने (ॲड. नेदुमपारा) याचिका दाखल करून वरिष्ठ वकील (Senior Advocate) व कनिष्ठ वकील (Junior Advocate) हा भेदभाव संपविण्यासाठी कायदा बनविण्याची मागणी केली होती. त्या सुनावणीवेळी ॲड. नेदुमपारा यांनी ॲड. फली नरिमन यांच्या वकलत्याचा दाखला दिला. ॲड. फली नरिमन हे न्या. रोहिंग्टन नरिमन यांचे वडील असल्यामुळे ते चिडले व त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या कायद्याविरुद्ध जाऊन ॲड. नेदुमपारा यांना उत्तर दाखल करण्याची कोणतीही संधी न देता त्यांना कोर्ट अवमानना अंतर्गत दोषी ठरविले व शिक्षेसाठी दि.२७ मार्च, २०१९ ही तारीख निश्चित केली .

भारतीय राज्यघटना व संविधानातील विविध कलमांवर सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या कायद्यानुसार कोणत्याही आरोपांमध्ये आणि विशेषकरून कोर्ट अवमानना अंतर्गत येणाऱ्या प्रकरणामध्ये प्रथम आरोपीविरुद्ध आरोप निश्चित करून आरोपीला

(उर्वरित पान २ वर)